PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Deed Shahane
Year: 1979

Song: Yetes Ka Ga Pori
Lyricist: Jagdish Khebudkar

येतेस का गं पोरी
चल फिरायला जाऊ
तू येतेस का गं पोरी
चल फिरायला जाऊ
जोडीनं जाऊ सिनेमा पाहू
आन हाटेलात दोघंबी राहू
आरं बाजूला हो रं पोरा
नको लाडात येऊ
आरं बाजूला हो रं पोरा
नको लाडात येऊ
पाठी नको येऊ असा
येडा नको होऊ
माझ्या वाटला नको रं जाऊ
बोल येतेस का गं पोरी
चल फिरायला जाऊ
आरं बाजूला हो रं पोरा
नको लाडात येऊ

तुझ्या गळयात बांधीन मनी
न ठेव तू ध्यानी
गं माझे रानी
चल
तुझ्या गळयात बांधीन मनी
न ठेव तू ध्यानी
गं माझे रानी
तुझ्या नादाला लागायाला ये पोरा
आहे का रं मी अडाणी
आगं आज ना उदया
होशील तू माझी मग

आताच का नाही जाऊ
फुट
बाजूला हो रं पोरा
नको लाडात येऊ
जरा येतेस का गं पोरी
चल फिरायला जाऊ
जा जा तूच जा

मी लक्ष्मण तू उर्मिला
गं ये जोडीला
झालं काय लाजाया
हे...हे...
आता...
मी लक्ष्मण तू उर्मिला
गं ये जोडीला
झालं काय लाजाया
लाख मोलाची नाजूक काया
ही जाईल वाया
नको येऊ खेटाया
आगं हेरलिया तुला चल
ठाऊक मला चल
दोघंबी गंगेत न्हाऊ
हट
बाजूला हो रं पोरा
नको लाडात येऊ
येतेस का गं पोरी
चल फिरायला जाऊ
नाही म्हटलं ना
मला तुझी न तुला माझी

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*

PlanetRead
Literacy for a Billion

गरज आहे गं सखे साजणी
मला तुझी न तुला माझी
गरज आहे गं सखे साजणी
कशी
एका हातानं वाजे ना टाळी
ना चाले गाडी एका चाकानी
खरं आहे तुझं
चुकलंय माझं

आता झाले गेले विसरून जाऊ
मग येतेस ना गं पोरी
चल फिरायला जाऊ
हा हा
आता येतेस ना गं पोरी
चल फिरायला जाऊ
जोडीनं जाऊ सिनेमा पाहू
आन हाटेलात दोघंबी राहू

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*